दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.२४ ऑक्टोबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ६४ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 24 Oct 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 64 | Pages 4 | Rate 4 Rs

## आम्ही महायुतीत राहूनच निवडणूक लढवणार

# कोणी जास्त खुमी दाखवली तर धनुष्यबाण कसा चालतो ते दाखवू; उदय सामंतांचा इशारा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

आम्ही महायुतीत राहूनच निवडणूक लढवणार आहोत. पण, स्थानिक पातळीवर कोणी जास्त खुमी दाखवली तर धनुष्यबाण कसा चालतो ते दाखवू, असा इशारा शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिला आहे. एकनाथ शिंदे यांनी सुद्धा महायुतीत राहूनच निवडणूक लढवण्याची भूमिका घेतली आहे. तिन्ही पक्षाच्या नेत्यांना त्रास होणार नाही. महायुतीत जागावाटपाचा जो फॉर्म्युला असेल त्यानुसारच निर्णय होतील. तसेच महायुतीत मिठाचा खडा टाकणाऱ्यांना मात्र बाजूला केले पाहिजे, अशी भूमिका सामंत यांनी मांडली आहे.सध्या शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर यांनी भाजप नेते व केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर जैन बोर्डिंग प्रकरणी गंभीर आरोप केले आहेत. यावर बोलताना उदय सामंत म्हणाले, रवींद्र धंगेकर यांच्या सोबत मी स्वतः बोलणार आहे. त्यांना भेटायला जाणार आहे. त्यांनी संयम बाळगला पाहिजे, तसा बाकीच्या नेत्यांनीही बाळगला पाहिजे. धंगेकर यांच्यावर कारवाई करायची असेल, तर मग नवी मुंबईत काय घडले हेही पहावे लागेल. कोणी सुरुवात केली हे सर्वांना माहीत आहे, असे म्हणत सामंत यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्यावर निशाणा साधला आहे.पत्रकार परिषदेत बोलताना मंत्री उदय सामंत यांनी बालनाट्य परिषदेवर झालेल्या आरोपांवर देखील भाष्य केले आहे. ते म्हणाले, हा पूर्णपणे बालनाट्य परिषदेचा विषय आहे आणि ज्यांनी आरोप केले त्यांनीच आता खुलासा केला पाहिजे. तसेच संजय राऊत यांच्या राहुल गांधी पंतप्रधान वक्तव्यावर प्रत्युत्तर देताना सामंत म्हणाले, राहुल गांधी पंतप्रधान होणार हे दिवास्वप्न आहे. राहुल गांधी पंतप्रधान होतील असे म्हणणे म्हणजे मी ट्रम्प झालो, असेच आहे, अशी खोचक टीका सामंत यांनी केली.दरम्यान, आगामी निवडणुकीच्या तोंडावर महायुतीमध्ये अनेक भागांमध्ये अंतर्गत वाद असल्याचे समोर येत आहे. रवींद्र धंगेकर हे अनेक दिवसांपासून मुरलीधर मोहोळ यांच्यावर आरोप करत आहेत. तर दुसरीकडे नवी मुंबईत गणेश नाईक हे देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका टिप्पणी करताना दिसून येत आहेत. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीत नेमके काय चित्र पाहायला मिळणार याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे.



# मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी मंगेश चिवटेंचा मदतीचा हात!

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीस एक लाखांचा धनादेश केला सुपूर्द

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दीपावली-पाडवा निमित्त भेटून मंगेश चिवटे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी मराठवाड्यातील पूरग्रस्त बांधवांसाठी एक संवेदनशील आणि समाजहितकारी पाऊल उचलत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीस एक लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.या प्रसंगी मंगेश चिवटे यांनी सांगितले की, पूरग्रस्तांच्या मदतीसाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येणे ही आजची गरज आहे. संकटाच्या काळात एकमेकांना हात देणं हीच खरी दिवाळीची भावना आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाचे कौतुक करत मंगेश चिवटे यांचे सामाजिक बांधिलकीबद्दल अभिनंदन केले आणि समाजातील इतर तरुणांनाही अशा कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. ही भेट आणि मदतीचा उपक्रम 'वर्षा' निवासस्थानी पार पडला असून, दिवाळीच्या या सणात समाजसेवेची दीपज्योत उजळवणारा हा उपक्रम म्हणून सर्वत्र प्रशंसेचा विषय ठरला आहे.



# कॉन्ट्रॅक्टर अनिल मस्के यांच्यासह मान्यवरांनी केले जगतकर कुटुंबियांचे सांत्वन

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातील ज्येष्ठ पत्रकार बालाजी जगतकर तसेच इंजी. राजू जगतकर यांचे वडील स्मृतिशेष श्रावणदादा जगतकर यांचे दिनांक १६ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परळी शहरासह सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर शासनमान्य कॉन्ट्रॅक्टर व समाजसेवक अनिल मस्के यांनी परळीतील कासुमाय निवासस्थानी भेट देऊन जगतकर कुटुंबीयांना सांत्वनपर दिलासा दिला. दुःखाच्या या प्रसंगी त्यांनी कुटुंबीयांचे त्यांनी धीर देत, श्रावणदादांच्या आत्म्यास श्रद्धांजली वाहिली.या वेळी पी.आर.पी. पक्षाचे नेते सोपान ताटे, समाजसेवक सुनील गोदाम, तलाठी प्रमोद सावंत, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, राजाभाऊ जगतकर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी एकत्रितपणे दिवंगत श्रावणदादा जगतकर यांच्या कार्याची आठवण काढत, त्यांचे जीवन समाजासाठी आदर्श असल्याचे गौरवोद्गार काढले.श्रावणदादा जगतकर हे परळी शहरातील सर्वांसोबत प्रेमळ वर्तन, सुसंस्कारित कुटुंब आणि समाजनिष्ठ वृत्तीमुळे परिचित होते. त्यांच्या जाण्याने परळी शहराने एक प्रेमळ, सज्जन व समाजाभिमुख व्यक्तिमत्व गमावले आहे, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.या प्रसंगी परिसरातील नागरिक, मित्रपरिवार, पत्रकार बांधव आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहून जगतकर परिवाराला आपली सहवेदना व्यक्त केली.



# केज-कानडी रोडवर भीषण अपघात, कोल्हेवाडी येथील २० वर्षीय तरुण गंभीर जखमी

## पत्रकार नंदुलाल मिसाळ यांनी जखमीला दवाखान्यात केले रवाना

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११-३० वाजण्याच्या दरम्यान केज-कानडी माळी रोडवर शांताबाई तापडिया इंग्लिश स्कूल पासून एक किलोमीटर अंतरावर कानडीमाळी कडे जाणाऱ्या रस्त्यावर महेश सुभाष लुकडे,वय अंदाजे २० वर्षे, रा. कोल्हेवाडी या तरुणाचा भरधाव वेगाने दुचाकी रॉयल एनफिल्ड एम.एच. ४४ ए.बी.८६४७ या गाडीचा घसरून अपघात झाल्याचे प्राथमिक माहितीनुसार समोर आले आहे.सदरील तरुण अपघाताच्या ठिकाणी बराच वेळ पडून तडफडत होता.त्याचा चेहरा रक्त बंबाळ झाल्यामुळे त्याला ओळखणे अवघड जात होते.शेवटी त्याच्या काही गावकऱ्यांच्या मदतीने, त्याला केज येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले.सदरील अपघाताची माहिती मिळताच कोल्हेवाडीचे सरपंच नंदकुमार मिसाळ देखील त्या ठिकाणी पोहोचले.त्याला पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. दरम्यान कानडी रोडचे यश कन्स्ट्रक्शन कंपनीने काम अर्धवट ठेवल्याने तसेच पंखे न भरल्यामुळे अपघात होत आहेत परंतु प्रशासन याविषयी युग गिळुन गप्प बसलेले आहे. वारंवार आंदोलने करुन सुद्धा यश कन्स्ट्रक्शन ला मोकळीक दिली जात आहे.



# पुढील काही दिवसात हलका ते मध्यम पावसाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

सध्या जिल्ह्यात सोयाबीन पिकाची काढणी मोठ्या प्रमाणावर सुरू असून, हवामान खात्याने पुढील काही दिवसात हलका ते मध्यम पावसाचा इशारा दिलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपले पिक व उत्पादन सुरक्षित ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी केले आहे. काढणीस आलेले सोयाबीन पिक शक्य तितक्या लवकर काढून कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवावे. थ्रेशिंगचे काम (दाणे काढणी) हवामान पाहून करावे; पावसाची शक्यता असल्यास टाळावे. उघड्यावर ठेवलेले सोयाबीन दाणे किंवा झडपी पिक ताडपत्री, प्लास्टिक शीट किंवा पॉलिथिन कव्हरने झाकून ठेवावेत.

# भक्तीचा तेज, सेवाभावाची ओळख!-ह.भ.प.राजु महाराज लोखंडे व अण्णासाहेब साबळे यांचा मच्छिंद्रनाथ देवस्थानात गौरवपूर्ण सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

मच्छिंद्रनाथ महाराजांच्या पवित्र नगरीत भक्ती, श्रद्धा आणि सेवाभावाचा अद्वितीय संगम अनुभवायला मिळाला.मच्छिंद्रनाथ देवस्थान दर्शनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध ह.भ.प.राजु महाराज लोखंडे आणि प्रामाणिक व जनतेच्या समस्यांना आवाज देणारे पत्रकार अण्णासाहेब साबळे यांचा देवस्थान ट्रस्टतर्फे गलब व श्रीफळ देऊन मानाचा सत्कार करण्यात आला.या सोहळ्यात देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दादासाहेब चितळे आणि सचिव बाळासाहेब मस्के यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी समाजसेवक बबनराव शिंदे,पोपट जाधव यांच्यासह अनेक भक्तजन उपस्थित होते.सत्कारावेळी उपस्थितांनी राजु महाराज लोखंडे यांच्या सहवासातून लाभलेल्या अध्यात्मिक अनुभवांचा, तसेच ५० वर्षांपूर्वी व ५० वर्षांनंतरही अचूक भाकीत सांगणाऱ्या त्यांच्या तर्कशक्तीचा गौरव केला. त्याचप्रमाणे पत्रकार अण्णासाहेब साबळे यांच्या सामाजिक बांधिलकी, निःस्वार्थ पत्रकारिता आणि लोकहितासाठीच्या कार्याचे सर्वांनी कौतुक केले.


या प्रसंगी मच्छिंद्रनाथ देवस्थानात भक्ती,श्रद्धा आणि सेवेचा दिव्य संगम साकारला होता.वातावरणात भक्तीचा सुगंध दरवळत असताना उपस्थितांनी जय मच्छिंद्रनाथ!च्या घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय करून टाकला. मच्छिंद्रनाथ नगरीत भक्तीचा उत्सव - ह.भ.प. राजु महाराज लोखंडे आणि पत्रकार अण्णासाहेब साबळे यांच्या सेवाभावी कार्याचा सन्मान!





संपादकीय

# लहानपण देगा देवा...



दिवशी मी कामाहून घरी यायला निघालो होतो. प्लॅटफॉर्मवर येऊन पोचलो. पण अगदी दोन मिनिटांनी माझी लोकल चुकली. आता आणखी सात-आठ मिनिटे पुढच्या ट्रेनसाठी ताटकळत राहावं लागेल, म्हणून चिडचिड होत होती. नंतरच्या ट्रेनमध्ये कसाबसा प्रवेश करण्यात मी यशस्वी झालो. उसाच्या गुऱ्हाळात ऊस चिपाड होऊन बाहेर फेकला जातो, जवळजवळ तसाच मी उतरताना डब्यात दाटीवाटीने कोंबलेल्या गर्दीमुळे अगदी चुरगळून बाहेर फेकलो गेलो. मनात नीरस भाव स्रवायला लागले.

रिक्षा स्टँडवर तर प्रत्येक रिक्षावाल्याने माझ्या नाकासमोर येऊन टिच्चून नकारघंटाच वाजवायची ठरवली होती, असं मला वाटलं. माझ्या याचनेला शेवटी एका उदार रिक्षावाल्याने दाद दिली. प्रवासातल्या ह्या त्रासिक कटकटींनी कंटाळलेल्या अवस्थेत मी घराच्या दारावरची बेल वाजवली आणि दार उघडताच 'आजोबा आले,' असं जोरात ओरडत माझ्या सहा वर्षांच्या नातीने माझ्या मळून गेलेल्या कपड्यांची पर्वा न करता धावत येऊन मला घट्ट मिठी मारली. त्या क्षणी माझा दिवसभराचा त्रास, त्रागा आणि नकारात्मकता नातीच्या मिठीत विरघळून गेली. 'जादूची झप्पी' काय असते, त्याचा मला प्रत्यय आला.

खरंच या नातवंडांचं प्रेम केवढे निरपेक्ष असतं! आजोबांच्या ओढीपुढे या नातवंडांच्या मनात आजोबांचे घामाने चिंब भिजलेले कपडे, थकलेला चेहरा एकदम गौण ठरतात. अशा निरपेक्ष प्रेमाने ओथंबलेल्या नातवंडांच्या जादूच्या झप्प्या ज्या घरात अनुभवल्या जातात, त्या घरात आनंदाच्या थप्प्याच रचल्या जातात, असं माझं प्रांजळ मत आहे. आपण कितीही मोठे झालो... कितीही उच्चपदस्थ झालो, कितीही सोयीसुविधांनी मढवलेल्या घरात राहायला लागलो; तरी निर्लेप अमूल्य आनंदाच्या क्षणांचा लेखाजोखा मांडू लागलो तर प्रौढपणात आपल्यातले बालपण जागवणाऱ्या नातवंडांबरोबरचे व्यतित केलेले क्षण निश्चितच अग्रस्थान पटकावतात. नातवंडांबरोबर सापशिडी, आंधळी कोशिंबीर, लपाछपी असे बालपणीचे खेळ खेळता खेळता आपण लहानांहून लहान होत जातो आणि संत तुकारामांनी रचलेल्या 'लहानपण देगा देवा... मुंगी साखरेचा रवा' या पंक्तींची अनुभूती ही नातवंडं नकळत आपल्याला सतत करून देत राहतात.दोन दिवसांपूर्वीच फोनवर बोलताना बहीण म्हणाली, आज थकल्यासारखं वाटत आहे रे ! म्हणून तिला भेटायला तिच्या घरी गेलो. ती एकाच जागी बसून बोलत होती. थकल्यासारखी दिसत होती खरी. इतक्यात शाळेतून तिची नात आली आणि जादूची कांडी फिरावी, तसा बदल बहिणीत दिसू लागला. लगबगीने जाऊन तिने तिच्या नातीला दूध, खाणं दिलं. तिच्या नातीला वरच्या कपाटातलं खेळणं हवं होतं, म्हणून ते स्टूलवर चढून काढून दिले. नंतर कपाटाखाली नातीचा बॉल गेला म्हणून जमिनीवर झोपून झाडूने कोपऱ्यात गेलेला तो बॉल काढून दिलेला पाहून तर मी तोंडात बोटे घालून शिट्ट्या मारणं तेवढे शिल्लक होतं. नातीच्या फक्त उपस्थितीने तिचा थकवा, मरगळ कुठच्याकुठे पळून गेली होती. हे सर्व करूनही दमलेला दिसण्याऐवजी तिचा चेहरा उल्हसित दिसत होता. नातवंड ही आनंदाचे स्रोत असतात, याची जाणीव मला पुनश्च एकदा झाली.आयुष्यातील हवेहवेसे, पुन्हा अनुभवावेसे वाटणारे प्रसंग आपल्याला फक्त नातवंडांच्या सान्निध्यातच येतात. कधी ती आपली आई होऊन आपल्याला प्रेमानं घास भरवतात; तर कधी आपली शिक्षिका होऊन आपली शाळा घेतात. कधी आपली मैत्रीण होऊन भातुकलीच्या खेळात आपल्याला गुंतवून टाकतात. कधी लुटुपुटूची लढाई खेळतात. खोटंनाटं का असेना; पण हे असे आयुष्यातले पुनःप्रक्षेपण आपलं मन प्रफुल्लित करून जातं.

# खरी डिजिटल साक्षरता



विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारताने कम्प्युटर युगात पहिले पाऊल टाकले तेव्हा सर्वसामान्यांना कम्प्युटर ही गोष्ट गूढ आणि जणू जादूच वाटायची. 'बटण दाबल्यावर काहीतरी बिघडेल' अशी भीती मनात असायची. परंतु आता कम्प्युटर हे केवळ यंत्र राहिलेले नाही. ते माणसाच्या विचारविश्वात शिरले आहे. अर्थात, ही वाटचाल एक दिवसात घडलेली नाही.विसाव्या शतकाच्या अखेरीस, कम्प्युटरविषयी जनसामान्यांमध्ये असणारी अनामिक भीती, शंका, आणि संकोच दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एमएस-सीआयटी हा कम्प्युटर साक्षरतेचा मूलभूत अभ्यासक्रम सुरू केला. हा अभ्यासक्रम म्हणजे ग्रामीण ते शहरी, शिक्षक ते नोकरदार, तरुण ते गृहिणी, सर्वांसाठी एक नवा अध्याय होता. कोकणातील एखादा शिक्षक, छत्रपती संभाजीनगरमधील शेतकऱ्याचा मुलगा, नागपूरमधील घरकाम करणारी महिला, पुण्यातील छोटा व्यापारी - सगळ्यांनी कम्प्युटर शिक्षणाच्या या प्रवासात पहिले पाऊल टाकले. कम्प्युटरला बिचकणारा समाज आता आत्मविश्वासाने त्याच्या कळा दाबू लागला. त्या काळात डिजिटल साक्षर ही ओळखच प्रतिष्ठेची बाब होती.परंतु, आता आपण एका नवे वळण घेतले आहे. माहिती व तंत्रज्ञानाचा वापर केवळ साधन म्हणून नसून, निर्णय घेण्याच्या क्षमतेशी जोडला गेला आहे. कृत्रिम प्रज्ञा (एआय), मोठ्या प्रमाणावर भाषिक विश्लेषण करणारी उपकरणे, चॅटजीपीटी आणि ध्वनिचित्र विश्लेषण, हे सारेच शिक्षणात प्रवेश करत आहेत. पण हे करताना आपण मूलभूत प्रश्न विचारायला हवा - आपली शिक्षणव्यवस्था या बदलांसाठी मानसिक, बौद्धिक आणि व्यावहारिकदृष्ट्या सज्ज आहे का? शाळा-महाविद्यालयांमध्ये कम्प्युटर विषय असतो, पण त्या विषयाचे शिक्षण देणारा शिक्षक नसतो. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कम्प्युटर लॅब आहे, पण त्याचा स्विच क्वचितच चालू होतो. शहरी कॉलेजांत आधुनिक फळ्यांवर चित्रफिती दाखवल्या जातात, पण त्या मागे संकल्पना स्पष्ट करणारा शिक्षकच अस्पष्ट असतो. म्हणजे आपण साधने घेतली, पण संकल्पनांमध्ये कमकुवत राहिलो. याच काळात विद्यार्थ्यांच्या हातात मोबाइल आला, डेटा आला, आणि इंटरनेटवरची सर्व माहिती सहज उपलब्ध झाली. पण ही माहिती त्यांच्या विचारक्षमतेला पोषक ठरत आहे का? की केवळ 'तयार उत्तर' मिळवून, न विचार करता स्वीकारायची सवय त्यांना लागली आहे?आज शाळा, कॉलेजांत ऑनलाइन शिक्षण, 'कम्प्युटर शिक्षण' आदी घोषवाक्ये सतत ऐकायला मिळतात. पण प्रत्यक्षात शिक्षकांना शासनाच्या 'दिक्षा', 'स्वयं', 'पीएम ई-विद्या' यांसारख्या व्यासपीठांची माहिती आहे का? ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी, मोबाइल डेटा, स्मार्टफोन, कम्प्युटर अक्षरज्ञान हे अजूनही आव्हान आहे. शहरांमध्येही ही स्थिती फारशी वेगळी नाही. अनेक शिक्षक कम्प्युटर शिक्षणावर विश्वास ठेवतात, पण प्रत्यक्षात त्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात मागे पडतात. दुसरीकडे, विद्यार्थी वर्ग अधिक डिजिटल झाला आहे, परंतु अधिक अभ्यसनशील, विचारशील वा सर्जनशील झालेला नाही. माहितीचा स्फोट झाला असला तरी ज्ञाननिर्मितीचे प्रमाण घटले आहे. याला कारण ठरत आहेत चॅटजीपीटीसारखी साधने... जी उत्तरे तयार करून देतात. अशा साधनांचा वापर होणे चुकीचे नाही, पण त्यांच्यावर अवलंबून राहणे चुकीचे आहे. एका नामांकित कॉलेजात असेच घडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अभ्यास प्रबंधाची भाषा, संरचना आणि उदाहरणे इतकी उच्च प्रतीची होती, की ती त्या विद्यार्थ्यांच्या पातळीला शोभणारीच नव्हती. चौकशीनंतर समजले की, सर्व प्रबंध एआय साहाय्यकाद्वारे तयार केलेले होते. हे पाहून शिक्षणसंस्थेने विद्यार्थ्यांना दोषी ठरवले, पण खरा दोष कोणाचा? शिक्षणपद्धतीने त्यांना हे साधन कसे वापरायचे हे शिकवले नव्हते. शिक्षकांनाही याची माहिती नव्हती, प्रशिक्षण नव्हते. आज शिक्षण फक्त 'माहिती देणे' इतकेच मर्यादित राहिले आहे का? शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट चिंतन, चर्चा आणि चिरंतन जिज्ञासा नाही का? विद्यार्थ्याला जर कुतूहलच नसेल, तर मग त्याला डिजिटल यंत्रातून आलेली उत्तरे फक्त 'आशय' देतील, अर्थ नाही.कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ कम्प्युटर साधन नाही, तर विचारप्रक्रियेवर परिणाम करणारे शक्तिशाली माध्यम आहे. शिक्षण क्षेत्रात या साधनांचा उपयोग करताना नैतिकता, संदर्भाधारित समज, माहिती विश्वसनीयतेचा अभ्यास, आणि सर्जनशीलतेची वृद्धी याचा विचार करणे आवश्यक आहे. या सर्व पैलूंमध्ये ग्रंथपालांची भूमिका केवळ पूरक नव्हे, तर केंद्रीय ठरते. ग्रंथपाल हे केवळ पुस्तकांचे व्यवस्थापक नसतात; ते माहितीचे सूत्रधार, संशोधन मार्गदर्शक, संदर्भ चित्रीकरणाचे तज्ज्ञ, आणि माहिती साक्षरतेचे शिक्षक असतात. आज एआयसारख्या प्रणाली शैक्षणिक जगतात झपाट्याने प्रवेश करत असताना, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना या प्रणालींचा जाणीवपूर्वक, विवेकपूर्ण आणि नैतिक वापर शिकवण्याची जबाबदारी ग्रंथपालांवर येते. विद्यार्थ्यांना चॅटजीपीटीसारख्या प्रणालींपासून आलेली माहिती कोणत्या स्रोतावर आधारित आहे, ती विश्लेषणात्मक आहे की नाही, तिचा बौद्धिक संपदा हक्क (कॉपीराइट) काय आहे, हे समजून घेण्यासाठी ग्रंथपालांचे मार्गदर्शन अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे शिक्षकही शिक्षण साहित्य तयार करताना योग्य संदर्भ शोधणे, विश्वासार्ह माहितीचे मूल्यांकन करणे, वाचनयादी बनवणे आणि आंतरराष्ट्रीय शोधनैतिक नियम पाळणे या सर्व बाबतीत ग्रंथपालांकडून सशक्त मदत घेऊ शकतात.त्यामुळे शैक्षणिक संस्थांनी ग्रंथपालांना पारंपरिक चौकटीत अडकवून न ठेवता, त्यांना डिजिटल व एआय युगाच्या 'माहिती नेत्यां'सारखी भूमिका द्यायला हवी. प्रशिक्षण, धोरणनिर्मितीतील सहभाग आणि निर्णय प्रक्रियेत त्यांना सक्रिय स्थान देणे ही केवळ गरज नसून, शिक्षणाच्या उज्वल भवितव्यासाठीची अपरिहार्यता आहे.केवळ कम्प्युटर उघडणे, वापरणे किंवा संदेश पाठवणे एवढीच साक्षरता मर्यादित आहे. माहिती कोणती योग्य? तंत्रज्ञानाचा वापर नैतिक आहे का? कम्प्युटर हे साधन आहे, की पर्याय? निर्णय घेताना कृत्रिम बुद्धिमत्तेवर किती विसंबायचं? याबाबत जी विश्वेषण करते ती खरी डिजिटल साक्षरता. उल्लेख केलेल्या या प्रश्नांची उत्तरे आपल्या शिक्षणसंस्थांनी द्यायला हवीत. शिक्षकांना नियमित तांत्रिक प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. विद्यार्थ्यांना त्याचा सर्जनशील व विवेकाधिष्ठित वापर शिकवला गेला पाहिजे. आणि शासनाने 'डिजिटल साक्षरता' ही केवळ घोषणा म्हणून न मांडता, ती एक सामाजिक गरज म्हणून ओळखून तिची मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी करायला हवी.आज आपण कम्प्युटर शिक्षणाच्या दुसऱ्या पर्वात प्रवेश करत आहोत. पहिले पर्व एमएस-सीआयटीचे होते. त्यात कम्प्युटर हाताळण्याचे कौशल्य मिळाले. पण दुसरे पर्व हे कृत्रिम प्रज्ञा, माहिती विश्लेषण आणि नैतिक वापराच्या शाश्वत मूल्यांवर आधारित असायला हवे. शिक्षण हे केवळ माहिती देणारे नसावे. ते विचार देणारे, प्रश्न विचारायला लावणारे आणि समाज घडवणारे असावे. जर आपण शिक्षणाचे हे मूलभूत उद्दिष्ट विसरलो, तर तंत्रज्ञानाच्या भूलथापांमध्ये आपले ज्ञान हरवून बसेल. आपण तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे, पण त्याचा उचित वापर, सतत प्रशिक्षण, शिक्षकांची सजगता आणि विद्यार्थ्यांची जबाबदारी हाच खरा 'डिजिटल भारत' घडवणारा मार्ग आहे.

# खेळा शिस्तीत



भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) चे राष्ट्रीय क्रीडा महासंघात येणे ही आगामी राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाची सर्वांत मोठी उपलब्धी आहे. क्रीडा क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणणे, उत्तरदायित्व लागू करणे आणि निर्णयप्रक्रियेत खेळाडूंना अधिक ठोस आवाज देणे, हे याचे उद्देश आहेत. आजपर्यंत सरकारने विविध संघटनांमधील समस्या सोडविण्यासाठी आणि संघटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी या पूर्वी तीन विधेयके आणण्याचा प्रयत्न केला होता. या विधेयकाचा पूर्वीचा मसुदा बाजूला पडला असला, तरी सन २०३६च्या ऑलिम्पिकचे भारतात आयोजन करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मोदी सरकारने नवीन क्रीडा विधेयक मंजूर करण्यासाठी योग्य वेळ निवडली आहे.या वेळी क्रीडा मंत्रालयाने व्यापक दृष्टिकोन ठेवून प्रथम आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीची भेट घेतली आणि त्यांना आश्वासन दिले, की ते ऑलिम्पिकची भावना आणि 'चार्टर'नुसार काम करतील. त्यानंतर विखुरलेल्या भारतीय ऑलिम्पिक संघटनेमधील (आयओए) सर्व गटांना या तरतुदी लवकरात लवकर मान्य व्हाव्यात, यासाठी प्रयत्न करण्यात आले. क्रीडाक्षेत्रात देशाच्या भविष्याला आकार देण्यासाठी, सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी क्रीडा व युवक मंत्रालयासाठी ३७९४ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केली आहे. गेल्या वर्षीच्या सुधारित अर्थसंकल्पातील ३,२३२ कोटी रुपयांपेक्षा ही मोठी वाढ आहे. सर्व राष्ट्रीय क्रीडा महासंघांना सरकारकडून आर्थिक मदत मिळत आहे. मंत्रालयाने हे पैसे खेळाडूंपर्यंत पोहोचतील याची खात्री केली असून कागदोपत्रीच अस्तित्व असलेल्या अनेक महासंघांवर निश्चितच काही नियंत्रण आवश्यक आहे.

अनेक राष्ट्रीय महासंघांच्या पदांवर राजकीय नेते आणि नोकरशहांचे वर्चस्व आहे. आज न्यायालये आणि केंद्रीय न्यायाधिकरणांमध्ये सुमारे ७७० क्रीडा-संबंधित प्रकरणे प्रलंबित आहेत. सन २०१५पासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये विविध क्रीडा संस्थांमधील प्रशासन, निवडणुका आणि खेळाडूनिवडीसंदर्भातील वाद आहेत. यातील काही महत्त्वाची प्रकरणे उच्च न्यायालये (४६२) आणि सर्वोच्च न्यायालयात (२२) आहेत. त्यात अनेक राष्ट्रीय क्रीडा महासंघ याचिकाकर्ते किंवा प्रतिवादी म्हणून सहभागी आहेत. २००हून अधिक प्रकरणांमध्ये राष्ट्रीय क्रीडा महासंघ एक तर खटला दाखल करणारा पक्ष आहे; किंवा त्यांच्यावर खटला दाखल होत आहे.दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या '२६/८' निकाल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आदेशांची मालिका 'बेंचमार्क' झाली आणि राष्ट्रीय क्रीडा महासंघाच्या अनेक निवडणुका रद्द करण्यात आल्या. क्रीडा आणि युवक मंत्रालयाने २६/८ आदेशांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले, त्याच्या निर्णयाची प्रतीक्षा आहे. राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणाची स्थापना ही बाब कायमची संपवण्याचे आश्वासन देते; कारण त्याकडे दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील. यामध्ये एक अध्यक्ष आणि इतर दोन सदस्य असतील. न्यायाधिकरणाचे प्रमुख सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा निवृत्त न्यायाधीश अथवा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असतील. यावरील नियुक्त्या केंद्र सरकारच्या हाती असतील; त्यात सरन्यायाधीश किंवा सरन्यायाधीशांनी शिफारस केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील समिती किंवा विधी आणि न्याय मंत्रालयातील सचिव आणि क्रीडा सचिवांचा समावेश असेल.आर्थिक अनियमितता आणि सार्वजनिक हिताच्या विरुद्ध असलेल्या कृतींसह, नियमांचे उल्लंघन झाल्यास केंद्र सरकारला सदस्यांना काढून टाकण्याचा अधिकार असेल. या न्यायाधिकरणाच्या आदेशांना केवळ सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येईल; त्यामुळे खेळांशी संबंधित वादांचे निराकरण करण्यात कोणतीही कनिष्ठ न्यायालये सहभागी होणार नाही. त्याचा परिणाम वादांच्या जलद निपटाऱ्यात होईल. न्यायाधिकरणाच्या निर्णयानंतर ३० दिवसांत अपील दाखल करावे लागेल; परंतु अंतिम मुदत संपल्यानंतर ते दाखल करता येईल, का हे ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला असेल. राजकीय नेते, नोकरशहा आणि व्यक्तींकडून महासंघ कायमस्वरूपी ताब्यात घेण्याच्या विरोधात, या विधेयकात विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार क्रीडा संस्थांमध्ये अध्यक्ष, सरचिटणीस आणि कोषाध्यक्ष या पदांसाठी सलग तीन टर्मची कार्यकाळ मर्यादा १२ वर्षांपर्यंत निश्चित केली आहे. आंतरराष्ट्रीय सनद आणि संबंधित खेळाच्या कायद्यांनुसार नामांकनाच्या वेळी वयोमर्यादा ७० वर्षे ठेवण्यात आली आहे, ती ७५ वर्षांपर्यंत वाढवता येऊ शकेल.सोयीसाठी आणि राजकीय हेतूंसाठी पूर्वी स्थापन केलेल्या मोठ्या कार्यकारी समित्यांमधून, महासंघावर आर्थिक भार जास्त नसावा, याची खात्री करण्यासाठी क्रीडा संस्थेच्या संख्येवर १५ची मर्यादा घालण्यात आली आहे. कार्यकारी समितीमध्ये किमान दोन उत्कृष्ट गुणवत्तेचे खेळाडू आणि चार महिला पदांवर असणे अनिवार्य असेल. क्रीडा प्रशासनात लिंगसमानता सुनिश्चित करण्यासाठी आणि खेळाडूंना निर्णयप्रक्रियेत सहभागी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्नांशी सुसंगत अशी ही तरतूद आहे. विधेयकातील सर्वांत चर्चेचा आणि काहीसा वादग्रस्त भाग म्हणजे राष्ट्रीय क्रीडा मंडळाची (एनएसबी) तरतूद. या मंडळास सर्व राष्ट्रीय क्रीडा महासंघांना मान्यता देण्याचे, निलंबित करण्याचे आणि खेळाडूंच्या कल्याणासाठी आंतरराष्ट्रीय महासंघांशी सहयोग करण्याचे प्रमुख अधिकार असतील. त्याचे सदस्य केंद्र सरकार क्षमता, सचोटी आणि दर्जा असलेल्या व्यक्तींमधून नियुक्त करेल. त्यावरील नियुक्ती निवड समितीच्या शिफारशींवर आधारित असतील, तिचे अध्यक्ष कॅबिनेट सचिव किंवा क्रीडासचिव असतील. या पॅनेलचे इतर सदस्य भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक, राष्ट्रीय क्रीडा संस्थेचे अध्यक्ष किंवा महासचिव किंवा कोषाध्यक्ष म्हणून काम केलेले दोन क्रीडा प्रशासक आणि द्रोणाचार्य, खेलरत्न किंवा अर्जुन पुरस्कार विजेते एक खेळाडू असतील. कार्यकारी समितीसाठी निवडणुका घेण्यात अपयशी ठरलेल्या किंवा निवडणूक प्रक्रियेत गंभीर अनियमितता करणाऱ्या राष्ट्रीय संस्थेची मान्यता रद्द करण्याचा अधिकार मंडळाला देण्यात आला आहे.या व्यतिरिक्त, वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सादर करण्यात अपयशी ठरल्यास, किंवा सार्वजनिक निधीचा गैरवापर केल्यास 'एनएसबी'कडून निलंबनदेखील होऊ शकते. परंतु या संदर्भात निर्णय घेण्यापूर्वी संबंधित जागतिक संस्थेशी सल्लामसलत करणे आवश्यक असेल. केवळ मान्यताप्राप्त क्रीडा संघटनाच केंद्र सरकारकडून अनुदान किंवा इतर कोणतीही आर्थिक मदत मिळविण्यास पात्र असेल. कायदेतज्ज्ञांच्या मते भारतीय ऑलिंपिक संघटनेकडून भूमिका घेण्याचा हा भाग थोडा गोंधळात टाकणारा आहे. 'एनएसएफ'च्या निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात होणारे हेराफेरीचे आरोप पाहता, विधेयकात राष्ट्रीय क्रीडा निवडणूक पॅनेलचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. त्यानुसार राष्ट्रीय क्रीडा मंडळाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकार सदस्यांची नियुक्ती करेल. या पॅनेलमध्ये केंद्रीय किंवा राज्य निवडणूक आयोगाचे निवृत्त सदस्य किंवा राज्यांचे निवृत्त मुख्य निवडणूक अधिकारी किंवा उपनिवडणूक आयुक्त, म्हणजेच पुरेसे अनुभवी अधिकारी असतील. क्रीडा संस्थांच्या कार्यकारी समित्या आणि खेळाडू समितीच्या मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेण्यासाठी हे पॅनेल निवडणूक अधिकारी म्हणून काम करील. मंडळ विहित पद्धतीने राष्ट्रीय क्रीडा निवडणूक पॅनेलची एक यादी तयार करेल. यामुळे निवडणुकीच्या राजकारणातून उद्भवणाऱ्या अनेक कायदेशीर बाबींना जागेवरच आळा बसू शकेल.सन २०२८ च्या ऑलिंपिकमध्ये क्रिकेट खेळण्यास सुरुवात झाल्यानंतर, सरकारकडून आर्थिक मदत न घेता स्वतंत्रपणे चालवण्यात येणारी 'बीसीसीआय'देखील आपले स्थान गमावेल आणि त्यांना 'टीम इंडिया' म्हणून स्पर्धा करावी लागली तर त्यांना राष्ट्रीय क्रीडा महासंघ म्हणून मान्यता मिळेल. 'बीसीसीआय'च्या या वादातील प्रमुख मुद्दा म्हणजे सर्व मान्यताप्राप्त क्रीडा संघटनांना त्यांच्या कार्ये, कर्तव्ये आणि अधिकारांच्या वापराच्या संदर्भात माहिती अधिकार कायदा लागू होणार आहे. हा मंत्रालय आणि बीसीसीआय यांच्यातील एक मोठा वादाचा मुद्दा ठरण्याची शक्यता आहे. क्रिकेट हा ऑलिंपिक खेळ बनल्यानंतर, २०२८ च्या टी-२० स्वरूपात पदार्पण करण्यासाठी, बीसीसीआयला महासंघ म्हणून नोंदणी करावी लागेल. क्रिकेट बोर्डाने या मुद्द्याला तीव्र विरोध केला आहे; कारण ते त्यांच्या कामकाजासाठी सरकारी निधीवर अवलंबून नाहीत. या मुद्द्यावर बीसीसीआय सहमत होण्याची शक्यता खूपच कमी आहे.पण नवीन विधेयकातील एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की 'भारत', 'भारतीय' किंवा 'राष्ट्रीय' असे नाव, अथवा कोणतेही राष्ट्रीय चिन्ह वापरण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही क्रीडा संघटनेला केंद्र सरकारकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल. केंद्र सरकारला ते जनहितासाठी आवश्यक आणि योग्य वाटले, तर विधेयकात नमूद केलेल्या कोणत्याही तरतुदी शिथिल करण्याचा अधिकार असेल. या व्यतिरिक्त, सरकार या विधेयकातील तरतुदींची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा मंडळ किंवा इतर कोणत्याही व्यक्ती-संस्थेला असे निर्देश देऊ शकते. सरकारला असाधारण परिस्थितीत आणि राष्ट्रीय हितासाठी संबंधित खेळाच्या कोणत्याही राष्ट्रीय संघाच्या सहभागावर वाजवी निर्बंध लादण्याचा अधिकार असेल. हे विधेयक सादर झाल्यानंतर आणि दोन्ही सभागृहांत त्यावर चर्चा होऊन मंजूर झाल्यानंतर देशातील क्रीडाक्षेत्रात काय प्रगती होते, हे काळच ठरवील. नवीन कायदा या प्रगतीसाठी पूरक ठरले, की व्यावसायिक प्रशासक 'फेडरेशन' चालवण्याची जुनीच पद्धत वापरतात, हे सर्वांना दिसेलच.

एक गोष्ट निश्चित आहे, की आपल्या खेळाडूंना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी सर्वोत्तम कामगिरीची संधी मिळावी, यासाठी काही नियंत्रण आवश्यक आहे. खेळाडूंना अनुभव मिळावा, यासाठी आपल्याकडे सर्वात मोठ्या स्पर्धा भारतात आणल्या आहेत, लष्करासारखी व्यवस्था निर्माण केल्याने भारत जागतिक क्रमवारीत वर जाईल आणि आपण ऑलिंपिकची लावण्यासाठी अधिक चांगल्या परिस्थितीत असू. हे दूरवरच स्वप्न ठरू नये.

# सातपुड्याच्या कुशीत निसर्गाचा जलोत्सव वाहते धबधबे व झऱ्यांचे अद्भुत सौंदर्य

## सातपुड्यातील दिडशे फुटांवर फेसाळनारा डोकी घाट

दैनिक वादळ वार्ता

**बोरद । मंगेश पाटील**

सातपुड्याच्या दऱ्या-खोऱ्यांत सध्या निसर्गाने जणू जलकुंभच उघडला आहे. पावसाळ्याला पंधरा दिवसिं उलटले असले तरीही पर्वतरांगांमधून सतत वाहणारे झरे, ओढे, नाले, धबधबे हे निसर्गाचे चैतन्य टिकवून ठेवत आहेत. हिरवीगार झाडे, गार वाऱ्याची झुळूक, आणि दऱ्यांतून वाहणारे निर्मळ पाणी व धबधबे या सगळ्याने सातपुडा पुन्हा एकदा जिवंत झाल्यासारखा भासतो आहे.तळोदा तालुक्यातील केलापाणी, अक्राणी, अलवान, बोरवान नदी इत्यादी अशा परिसरात अजूनही पाणी वाहते आहे. हे पाणी केवळ दृश्य सौंदर्य निर्माण करत नाही, तर त्या मागे एक जीवनदायी प्रक्रिया सुरू असते. पर्वतरांगांमधून उतरणारे झरे नदी, नाल्यांत मिसळून भूजलपातळी वाढवतात, विहिरींना आधार देतात आणि शेतजमिनींची ओल टिकवून ठेवतात. या जलप्रवाहांमुळे सातपुड्याच्या मातीला पुन्हा नवचैतन्य मिळते.

आज या परिसरातील झरे आणि नाले हे केवळ निसर्गाचे दृष्य आकर्षण राहिलेले नाहीत, तर पर्यावरणीय संतुलनाचे प्रतीक ठरले आहेत. अशा वेळी स्थानिक प्रशासन व नागरिकांनी एकत्र येऊन या जलस्रोतांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. अवैध वाळू उपसा, अतिक्रमण, आणि दुर्लक्ष यामुळे ही नैसर्गिक संपत्ती नष्ट होऊ नये, यासाठी ठोस उपाययोजना आवश्यक आहेत.तळोदा तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगांमध्ये अनेक भागात आकर्षक घाट, धबधबे फेसाळतांना दिसून येत आहे. असाच एक दुर्लक्षित असलेला केलापाणी परिसरातील डोकी घाट सद्या आकर्षणाचे केंद्रबिंदू बनले आहे. त्यामुळे सद्या सोशल मीडियावर या घाट माथ्याचे, धबधब्यांचे, झऱ्यांचे, नद्यांचे आणि नाल्यांचे व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर शेअर होत असून, सातपुड्याच्या निसर्गाचे जगासमोर नवे दर्शन घडत आहे. हे दृश्य पाहून एकच भावना उमटते - सातपुडा म्हणजे फक्त पर्वत नाही, तो वाहत्या जीवनाचा प्रवाह आहे.



### गुलाब वळवी, केलापाणी

**सातपुड्यातील दऱ्या खोऱ्यातून वाहणाऱ्या झऱ्यांमधून फेसाळणारे घाट व धबधबे सद्या सातपुड्याचे सौंदर्य खुलवत आहेत. केलापाणी परिसरातील डोकी घाट हा साधारण दिडशे फुटांवरून कोसळतांना दिसून येत आहे. त्यामुळे मोठे आकर्षण ठरत असून पर्यटकांना खुणावतो आहे.**

**सातपुडा पर्वत रांगांमध्ये असे अनेक दुर्लक्षित ठिकाणे आहेत. तिथपर्यंत शासन व प्रशासन पोहोचलेले नाही. निसर्ग संपदेने नटलेल्या सातपुड्यात जैवविविधता, दुर्मिळ पक्षी, औषधी वनस्पती, तसेच पाण्याचे स्रोत हे मोठे आकर्षण आहे. या भागाचा विकास केल्यास रोजगारनिर्मिती बरोबरच पर्यावरण पर्यटनाला चालना मिळू शकते, असा विश्वास स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे. परंतु सध्या घाट माथ्यांकडे जाणारे रस्ते खड्डेमय, दिशादर्शक फलक नसणे, तसेच सुरक्षा व्यवस्थेचा अभाव या सर्व गोष्टींमुळे अपघातांचा धोका वाढत आहे. शासनाने या भागाकडे गांभीर्याने लक्ष देऊन पर्यटन विकास आराखडा राबवावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.**

## उस्माननगर ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांना चार पुरस्कार प्रदान

दैनिक वादळ वार्ता

**नादेड । प्रतिनिधी**

पोलिस अधीक्षक कार्यालय, नांदेड यांच्यावतीने सप्टेंबर २०२५ महिन्यातील उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल उस्माननगर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांना एक नव्हे तर तब्बल चार सन्मानपत्रांनी गौरविण्यात आले आहे. निलपत्रेवार यांनी प्रणालीत ६८.६६% डेटा फीडिंग करून २०२५ हा पुरस्कार पटकावला. त्याचप्रमाणे, सप्टेंबर महिन्यातील ५६ गुन्ह्यांचा यशस्वी निपटारा करून त्यांनी २०२५ हा सन्मान मिळवला. याचबरोबर, गुन्ह्यांतील आरोपींविरुद्ध ८२% कन्व्हिक्शन (शिक्षेचे प्रमाण) रेट राखत १८१ प्रकरणांपैकी

बेस्ट सप्टेबर ९५.७६% उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना ॆााशपवरलश्रश



झशीर्षीारपलश ेष ींहश चेपींह २०२५ हा तिसरा सन्मान देण्यात आला. ही सर्व प्रमाणपत्रे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमापे (भा.पो.से.) आणि पोलीस अधीक्षक अविनाश कुमार (भा. पो.से.) यांच्या स्वाक्षरीने प्रदान करण्यात आली आहेत.

विशेष म्हणजे, महिन्याभरात सर्वाधिक आरोपींना शिक्षा मिळवून देण्यात उस्माननगर पोलीस ठाण्याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या त्रिगुणी गौरवामुळे संजय निलपत्रेवार यांनी संपूर्ण श्रेय उस्माननगर पोलीस स्टेशन येथील अधिकारी व कर्मचारी यांचे आहे असे त्यांनी पत्रकारां सोबत चर्चा करताना सांगितले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**भोकर । प्रतिनिधी**

भोकर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. आगामी स्थानिक् स्वराज्य् संस्था निवडणुका लक्षात घेता पक्ष संघटना अधिक मजबूत आणि संघटित करण्यावर तसेच संघटनेच्या रचनेत करण्यात येणाऱ्या आगामी रचनात्मक बदलांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी माझ्या समवेत मा.आ मोहनराव हंबर्डे, मा.आ सुभाषराव साबणे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगांवकर, शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, प्रदेश सचिव सुनील नानवटे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष इंजि स्वप्निल इंगळे पाटील, उत्तमराव सोनकांबळे, राजेश्वर देशमुख, विश्वंभर पवार, श्रीकांत किन्हाळकर, आनंदराव डांगे, सुनितातांई बशीनलोड, सुरेखाताई कदम, रोहन कांबळे,गजानन पाटील, अभिषेक लुटे, नागोराव शिंडगे, एकनाथ जाधव, सुरेश बिल्लेवाड, गिरीश कदम, महेंद्र कांबळे, शिवाजीराव पाटील, आनंद ढवळे, प्रतीक्षा कांबळे, यशोदाताई शेळके, पूजाताई व्यवहारे, बबलू कदम यांच्यासह अनेक जण उपस्थित होते



## हाळदा कोलंबी रस्त्यावर मोटार सायकलचा अपघात एका युवकाचा मृत्यू तर एक गंभीर जखमी

दैनिक वादळ वार्ता

**कौठा । प्रतिनिधी**

बारूळ येथील मजूर लालोंडी तालुका नायगाव येथे कामासाठी जात असताना हळदा_ कोलंबी दरम्यान मोटरसायकलचा अपघात होऊन दोन युवक गंभीर झाले होते त्यांना तातडीने विष्णुपुरी येथील शंकरराव चव्हाण रुग्णालय येथे उपचारासाठी दाख ल करण्यात आले होते. त्यातील एका युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून एकाचे हात फॅक्चर झाले आहे.



सविस्तर माहिती अशी की, बारूळ तालुका कंधार येथील मजुरी करणारे कुटुंब सोयाबीनची सुगी करण्यासाठी नायगाव तालुक्यातील लालवंडी येथे जात असताना ज्ञानेश्वर विलास जाधव (२१) व कोंडीबा किशन जाधव ( २०) दिनांक १७ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी सात ते आठच्या दरम्यान मोटारसायकल वरून जात असताना हळदा_कोलंबी दरम्यान मोटरसायकलचा अपघात झाला दोघेही गंभीर जखमी झाले होते त्यांना विष्णुपुरी येथील शंकरराव चव्हाण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान डोक्याला गंभीर दुखापत झालेले ज्ञानेश्वर विलास जाधव यांचे दिनांक २० ऑक्टोबर रोजी पहाटे मृत्यू झाला व कोंडीबा यांचा हात फॅक्चर झाला असून किरकोळ मारू लागला आहे. ज्ञानेश्वर यांचेवर बारूळ येथील स्मशानभूमीत आज दिनांक २० ऑक्टोबर रोजी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले अविवाहित युवकांच्या मृत्यूमुळे आई-वडिलांचा आधार नाहीसा झाला असून या घटनेचे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

रस्ते अपघात होऊन मृत्यू पावल्यामुळे शासनाने मदत करावी अशी मागणी होत आहे.

## बीड नगरपालिका भाजपाच्या ताब्यात येणार-नवनाथ शिराळे पाटील

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणा समोर काल चाय पे चर्चा बीड नगरपालिका निवडणूक संधर्भात झाली. या वेळी माजी सभापती नं. प. बीड चे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी सांगितले की, येणाऱ्या बीड नगरपालिका मध्ये सर्वात जास्त उमेदवार भाजपा चे उमेदवार निवडून आणू अशी कामगिरी आम्ही सर्व भाजपा पदाधिकारी व सर्व कार्यकर्ते, नेते करणार आहोत. जनतेला आता भाजपा वर विश्वास आहे कारण की केंद्रामध्ये भारत देशाचे माननीय लोकप्रिय मा प्रधानमंत्री नरेंद्र जी भाई मोदी साहेब आहेत आणि महाराष्ट्र राज्यांमध्ये सुसंस्कृत तो अभ्यासू व्यक्तिमत्व माननीय श्री मुख्यमंत्री नामदार देवेंद्र जी फडणवीस साहेब उर्फ देवा भाऊ साहेब आहेत यांनी सर्व जनहिताच्या महत्त्वाच्या अनेक समस्या सोडल्या असून अनेक महत्वाच्या योजना देखील घरा घरात पोहचविल्या आहेत तसेच सर्वात गजलेली योजना म्हणजे लाडकी बहीण अशा अनेक योजना भाजपा ने महाराष्ट्र राज्यातील अनेक नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत मध्ये राबविल्या आहेत. बीड जिल्ह्यामध्ये अनेक प्रकल्प अनेक दळणवळणाचे काम केले आहेत मग रेल्वे लाईन असो किंवा विमानतळ असो किंवा छत्रपती संभाजी नगर ते सोलापूर धाराशिव मोठा हायवे असो बीड शहराच्या बाजूचे मोठे मोठे हायवे बायपास असो हे बीड जिल्ह्याच्या भूमि कन्या तथा महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यामध्ये अनेक महत्त्वाच्या योजना राबवल्या आहेत म्हणून बीड जिल्ह्याची ताकत देखील वाढली आहे. त्यामुळं आता बीड नगरपरिषद मध्ये भाजपा चा झेंडा नक्कीच फडकेल असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी आपले अभ्यासपूर्वक विचार व्यक्त करताना सांगितले आहे. या वेळी येथे उपस्थित असलेले महाराष्ट्रामध्ये सर्वात अग्रेसर असलेला व सर्वांच्या सुखदुःखामध्ये सातत्याने सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघांचे मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब तसेच येथे उपस्थित असलेले ज्येष्ठ पत्रकार तथा दैनिक न्याय टाइम्सचे मा सह संपादक अनिल जी कचरे साहेब तसेच श्रीक्षेत्र कंकालेश्वर मंदिराचे पुजारी गुरव मामा तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक तथा दैनिक न्याय टाइम्सचे बीड तालुका प्रतिनिधी तथा साप्ताहिक समीकरण वार्ताचे कार्यकारी संपादक मा श्री संजय जी देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते .



## मा.आ.भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने नागरिकाकडून भाऊराव पाटील गोरेगावकर यांचा भव्य सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**सेनगाव । प्रतिनिधी**

हिंगोली विधानसभेवर तीन वेळा आमदार राहिलेले भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी दि, १४ ऑक्टोंबर या तारखेला मुंबई येथे शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हजारो कार्यकर्त्यांसोबत प्रवेश केल्याने दिनांक १९ ऑगस्ट रोजी हिंगोली येथील त्यांच्या निवासस्थानी भाऊराव पाटील गोरेगावकर यांचा भव्य शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी चापटगाव चे सरपंच वसंतराव अवचार गुलाबराव अवचार रामेश्वर शिंदे अशोकराव कांबळे शेषेराव अवचार यांच्यासह आदी मान्यवरांनी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आगामी निवडणुकीला नक्कीच



शिवसेना शिंदे गटाला याचा फायदा होईल या दृष्टिकोनातून कळमदूरी विधानसभेचे आमदार संतोष बांगर यांनी भाऊराव पाटील गोरेगावकर ,भास्करराव बेंगाळ, द्वारका भाऊ सारडा ,संजय (भैया ) देशमुख यांच्यासह आदी कार्यकर्त्यांना मुंबई येथे पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या हस्ते जाहीर प्रवेश केल्याने आला आगामी निवडणुकीला नक्कीच याचा फायदा होईल, आज सापटगाव च्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला,

## कलंबर(बु.) जिल्हा परिषद सर्कलच्या विकासासाठी सौ.केवळाबाई घोरबांड ह्या मैदानात उतरणार

दैनिक वादळ वार्ता

**कलंबर । प्रतिनिधी**

नांदेड जिल्हा परिषदेच्या निवडणूकीचे पडघम वाजत असतांना लोहा तालुक्यातील कलंबर(बु.) हा मतदार संघ खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी सुटलेला असल्यामुळे बाहेरील धनदांडग्या उमेदवाराचीच चर्चेला उत येत आहे.स्थानिक मतदारांना बाहेरील लादलेला धनदांडगा उमेदवार नको म्हणून स्थानिक मतदार संघातील सर्वसामान्य सेवाभावी वृत्तीने मागील तीन पिढ्या आजोबा,वडील व स्वत: शेतकरी, कष्टकरी, कामगार, युवकांना संधी,न्याय हक्कासाठी समाजहिताचे काम करणारे सुरेशराव घोरबांड गुरुजी सर्व परिचित आहेत.त्यांची आई सौ.केवळाबाई सुधाकरराव घोरबांड यांनी निवडणूक लढवावी असा मतदार संघातील जमलेल्या बहुसंख्य कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर त्या शेवटी तयार झाल्या. चांगल्या कार्यकर्त्यांनी निवडणूक लढवावी असा कार्यकर्त्यांचा मोठा आग्रह दिसून आला आहे. आज ह.भ.प.श्री नारायन महाराज निवघेकर यांच्या शुभ हस्ते पांगरा येथील महादेव मंदिर,रायवाडी श्री नंदिकेश्वर येथील मंदिरात नारळ फोडण्यात येवून मोठ्या उत्साहात प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विश्वनाथ पाटील घोरबांड, वसंत घोरबांड, शिवाजी कोटेवाड, पांडुरंग कोठेवाड, ज्ञानोबा पाटील जाधव, एकनाथ पाटील जाधव, पुजारी पांचाळ, पुजारी स्वामी,भगवान ठाकूर याच्यासह मोठ्या संख्येंनी भाविक भक्तासह मतदार उपस्थित होते.



# शेतकरी हितासाठी व अठरापगड जातींच्या एकतेसाठी कार्य करत राहु-रमेशराव आडसकर

## पाडवा स्नेहमेळाव्यात आडस येथे शुभेच्छा देण्यासाठी अलोट गर्दी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानाची दखल घेत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे कार्य करत आहोत,असे मत ज्येष्ठ नेते तथा अंबासहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर यांनी व्यक्त केले.पारंपरिक सामाजिक सलोखा जपण्यासाठी व अठरा पगड जातींना एकत्र घेऊन जाण्याचा वारसा पुढे नेण्यासाठी दीपावली पाडवा निमित्त आयोजित स्नेहमेळाव्यात विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.रमेशराव आडसकर म्हणाले की, जग पुढे जात असताना आपण आपल्या मुळाशी जोडलेले राहिले पाहिजे. स्व.आ.आडसकर तात्यांनी सुरू केलेली अठरापगड जातींच्या ऐक्याची परंपरा आम्ही जपतो आहोत. समाजकारण आणि राजकारणाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या सेवेत सदैव कार्यरत राहू. त्यांनी पुढे सांगितले की, जातीय तणाव दूर ठेवण्यासाठी सर्वयुवकांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे.येणारा काळ हा शेतकरी,कामगार, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेसाठी भरभराटीचा जावो,हीच शुभेच्छा.

प्रमुख मान्यवरांचे विचार संजय आबा दौंड (माजी आमदार) -आडसकर हे नाव जिल्ह्यात विश्वासाचं प्रतीक आहे.रमेशराव आडसकर हे भविष्यात आमदार होतील,याचा विश्वास आहे.जनतेचा आशीर्वाद त्यांच्या पाठीशी आहे.

राजेश्वर चव्हाण (जि.अ.रा.कॉ.) -आडसकर परिवाराने समाजाशी जिव्हाळ्याचं नातं जपलं



आहे. रमेशराव आडसकर यांचे राजकीय भविष्य उज्ज्वल आहे. दत्ता आबा पाटील (उपाध्यक्ष,अंबा साखर कारखाना)-आडसकर-पाटील वैर संपले आहे.आता उर्वरित आयुष्य एकत्र काम करत शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न करू. राज किशोर पापा मोदी-स्व.आडसकर तात्यांच्या प्रेरणेतून आम्ही काम करतो आहोत. रमेशराव आणि ऋषी भैय्या तात्यांचा वारसा पुढे नेत आहेत.आम्ही त्यांच्या सोबत आहोत. अंकुशराव अण्णा इंगळे (सभापती,कृ.उ.बा. समिती)-पूर्वीच्या निवडणुकांमध्ये आडसकरांनी इतरांना मदत केली,मात्र येणाऱ्या स्थानिक निवडणुकांमध्ये नागरिकांनी आडसकर कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहावं. डॉ.हारूणभाई इनामदार (नेते,राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार) --स्व.तात्यांनी पाया घातला आणि रमेशराव आडसकरांनी कळस चढवला.अठरापगड जातींच्या एकतेचा संदेश हा स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने अधोरेखित होतो आहे.या प्रसंगी उपस्थित मान्यवर राजाभाऊ औताडे, नगराध्यक्षा डॉ. सौ.सिताताई बनसोड, राहुल भैय्या सोनवणे, हनुमंत मोरे,ईश्वर मुंडे, नगरसेवक राजू इनामदार, धनंजय देशमुख,माधव तात्या निर्मळ,बबन भैय्या लोमटे,किसन कदम,अमर भैय्या पाटील,अजहर इनामदार,कैलास पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.स्नेहमेळावा यशस्वी पणे पार पडल्यानंतर सर्व मान्यवरांनी रमेशराव आडसकर यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.दिवाळी फराळाचा आस्वाद घेऊन कार्यक्रम संपन्न झाला.


## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात दिवाळी अंक प्रदर्शन,भाऊबीज,बाल ग्रंथवाचन कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ रोजी दिवाळीअंकप्रदर्शन, भाऊबीज व बालवाचक ग्रंथवाचन इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले.

सर्वप्रथम भाऊबीज साजरी करण्यात आली. त्यानंतर दिवाळीअंक प्रदर्शन घेण्यात आले त्यानंतर बालवाचकांचे टप्प्या टप्प्याने ग्रंथवाचन घेण्यात आले.ग्रंथवाचन यशवंत हणुमंत सौदागर, वेदांत शिवदास घाडगे, कृष्णराजे ज्ञानेश्वर गायकवाड यांनी केले. त्यानंतर दिवाळी अंक प्रदर्शन घेण्यात आले. यावेळी दिवाळी अंकाचे वाचन बाळासाहेब गायकवाड,रमेशराव गायकवाड यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे




गायकवाड,नारायणभाऊ गायकवाड, एम.आय.टी. पुणे चे गोविंद गायकवाड, बापूराव गायकवाड, बळीराम गायकवाड, ए.बी.गायकवाड,शिवाजी नांदे यांची उपस्थिती होती.दिवाळी अंक प्रदर्शनात वाचक, हितचिंतक,विद्यार्थी, युवक,जेष्ठ नागरीक यांनी सक्रीय सहभाग घेतला.

सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी माजी ग्रामपंचायत सदस्य रमेराराव गायकवाड हे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचालन ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य, डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

## जिल्हा पोलीस दलाच्या शहीद स्मारकाचे पालकमंत्री कोकाटे यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

२० ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा पोलीस दल परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य शहीद स्मारकाचे उद्घाटन नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री ड.माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. कर्तव्य बजावताना मृत्युमुखी पडलेल्या पोलीस अधिकारी आणि जवानांना श्रद्धांजली अर्पण करणे तसेच त्यांच्या शौर्यातून नागरिकांना स्फूर्ती मिळावी, हा या स्मारकाच्या उभारणीमागील मुख्य उद्देश आहे.

यावेळी विधानपरिषदेचे आमदार चंद्रकांत रघुवंशी, विधानसभेचे आमदार राजेश पाडवी तसेच आमदार आमश्या पाडवी यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा पोलीस



अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मनोगताने झाली. पोलीस अधीक्षकांनी या शहीद स्मारकाच्या निर्मितीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून मिळालेल्या मदतीचा उल्लेख करत पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांचे आभार मानले.यावेळी पालकमंत्री कोकाटे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शहीद जवानांनी राष्ट्रासाठी, समाजासाठी व नागरिकांच्या सुरक्षेसाठी दिलेले बलिदान हे अभिमानास्पद आहे आणि मी या स्मारकास अभिवादन करतो. या स्मारकामुळे त्यांचे कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचेल व नागरिकांना देशसेवेची प्रेरणा मिळेल.या कार्यक्रमास जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, उपजिल्हाधिकारी धनंजय गोगटे, पोलीस उपअधीक्षक (मुख्या) अनिल पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदुरबार संजय महाजन, उपविभागीय पोलीस अधिकारी अक्कलकुवा सुभाष भोये, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, उपविभागीय अधिकारी सा. बां. विभाग गणपत गावीत यांसह इतर अधिकारी, अंमलदार त्यांचे कुटुंबिय आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

### आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी

## नंदुरबार पोलिसांचा 'विशेष सुरक्षा कक्ष'; सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करून सामाजिक पूर्वग्रहांमुळे धोक्यात आलेल्या जोडप्यांना कायदेशीर आणि तात्काळ सुरक्षा पुरवण्यासाठी नंदुरबार जिल्हा प्रशासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली 'विशेष कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.

हा विशेष कक्ष पोलीस अधीक्षक कार्यालय, नंदुरबार येथे स्थापन करण्यात आला असून, परस्पर संमतीने विवाह करणाऱ्या युवक-युवतींना सामाजिक बंधने आणि धोक्यांपासून संरक्षण देण्याची जबाबदारी या कक्षाकडे सोपवण्यात आली आहे. हा कक्ष जोडप्यांना केवळ सुरक्षाच नाही, तर आवश्यक कायदेशीर सल्ला आणि मानसिक आधारही पुरवतो.

### सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश:

**'शक्ती वाहिनी विरुद्ध भारत सरकार व इतर' (रिट याचिका क्र. २३१/२०१०) या ऐतिहासिक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले होते की, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या सुरक्षेची जबाबदारी राज्य सरकारांची आहे आणि यासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र कक्ष स्थापन करणे अनिवार्य आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करत महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांप्रमाणे नंदुरबार जिल्ह्यातही हा उपक्रम सुरू झाला आहे.**

जिल्हा प्रशासनाने आवाहन केले आहे की, विवाहानंतर कोणत्याही प्रकारचा जिवीतास धोका निर्माण झाल्यास किंवा कुटुंबाकडून त्रास होत असल्यास, जोडप्यांनी त्वरित या विशेष कक्षाशी संपर्क साधावा. ई-मेल: sp.nandurbarmahapolice.gov.in

दूरध्वनी क्रमांक: ०२५६४-२१०११०० / ११०

आपत्कालीन सेवा: डायल ११२

नंदुरबार जिल्हा प्रशासनाचा हा उपक्रम सामाजिक सौहार्द, परस्पर आदर आणि भारतीय संविधानाने दिलेल्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या मूल्यांची जपणूक करण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे आणि कौतुकास्पद पाऊल आहे.

## क्रांतिवीर शहीद बाबुराव शेडमाके यांना शहिद दिनानिमित्त आदरांजली



दैनिक वादळ वार्ता

**जिवती । प्रतिनिधी**

क्रांतिवीर शहीद बाबुराव शेडमाके यांच्या शहिद दिनानिमित्त आज जिल्हा कारागृह परिसरातील शहीद बाबुराव शेडमाके स्मारक येथे त्यांच्या शहिद स्थळी स्मरण व आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित राहुन सर्वांनी शहीद बाबुराव शेडमाके यांच्या कार्याचे आणि बलिदानाचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले. यावेळी पालकमंत्री डॉ. प्रा अशोक उईके यांची उपस्थिती होती. तसेच राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्ष मा श्री हंसराज भैय्या अहिर, महानगर अध्यक्ष श्री.सुभाष कासनगोट्टूवार, भारतीय जनता पार्टी चे नेते श्री. प्रकाश देवतळे, अनुसूचित जमाती जिल्हाध्यक्ष श्री. जितेश कुळमेथे उपस्थित होतेया कार्यक्रमास भाजप चंद्रपूर महानगरचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मी सुद्धा या प्रसंगी उपस्थित राहून क्रांतिवीर शहीद बाबुराव शेडमाके यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

# तळोदा न.प.निवडणुकीचा ज्वर! आरक्षणा नंतर इच्छुकांची 'फराळ पॉलिटिक्स' शिगेला


## मतदार राजाची दिवाळी गोड, उमेदवारांनाही हुरूप

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगूल वाजत असतानाच, नुकत्याच जाहीर झालेल्या आरक्षणामुळे तळोदा नगर परिषदेत राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर होताच, विविध राजकीय पक्षांतील इच्छुक उमेदवारांनी कंबर कसली असून, उमेदवारी मिळवण्यासाठी आपापल्या पक्षश्रेष्ठींकडे जोरदार 'फिल्डिंग' लावण्यास सुरुवात केली आहे.

तळोदा नगर परिषदेमध्ये यावेळी नगराध्यक्षपदासाठी इच्छुकांची मोठी गर्दी जमली आहे. एकाच पदासाठी अनेक तगडे उमेदवार दावेदार असल्याने, विविध राजकीय पक्षांमार्फत नेमकी कोणाला संधी मिळते, याकडे केवळ तळोदा शहराचेच नव्हे, तर संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी अनेकांनी आपापल्या पक्षातील वरिष्ठांच्या भेटीगाठी वाढवल्या आहेत, तर काही जण तळोद्यातच शक्तिप्रदर्शन करण्याच्या तयारीत आहेत. यामध्ये नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेले उमेदवार देखील आतापासूनच घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेत आहेत. निवडणुकीपूर्वी मतदारांना आकर्षित करण्यासाठी सुरू असलेला राजकीय पक्षांचा आणि इच्छुकांचा 'दिवाळी फराळ' कार्यक्रम सध्या तळोद्यात चर्चेचा विषय बनला आहे. त्यात राजकीय पक्षांकडून मतदारांच्या घरी घरपोच दिवाळीचा फराळ पोहोचवण्यास सुरुवात केली आहे. कोणी लाडू, चिवड्याचे बॉक्स वाटप करत आहे, तर छानशा पिशवीत बुंदी, शेव, तसेच चिवडा



व शंकरपाळे देत आहेत. तर कोणी पेढ्यांचे वाटप करून मतदारांना खुश करत आहे. एकीकडे अनेक राजकीय पक्ष आणि त्यांचे इच्छुक उमेदवार फराळ घेऊन येत असल्याने, मतदार राजाची दिवाळी खरंच गोड झाली आहे! शहरात अक्षरशः 'फराळाचे पेव' फुटले आहे.

**या 'फराळ पॉलिटिक्स'मुळे मतदार राजा मात्र गोंधळलेल्या अवस्थेत आहे. प्रत्येक पक्षाकडून फराळ स्वीकारताना मतदार कुणालाही आपला कल दर्शवताना दिसत नाही. मतदारांनी फक्त फराळ स्वीकारण्याची भूमिका घेतल्याने, नेमका कोणाला पाठिंबा द्यायचा, हे 'गुपित' त्यांनी शेवटपर्यंत जपले आहे. त्यामुळे इच्छुकांचा उत्साह वाढला असला तरी, मतदारांना गृहीत धरणे कोणत्याही पक्षाला सोपे राहिलेले नाही.असे असले तरी, प्रत्येक इच्छुक आपणच उमेदवारी मिळवणार आणि जिंकणार, हे मतदारांपर्यंत बिंबवण्याचा जोरदार प्रयत्न करत आहे. सध्या सुरू असलेल्या या आनंददायी वातावरणामुळे तळोदा नगरपालिकेच्या मतदार राजाची यावर्षीची दिवाळी निश्चितच आनंदात आणि गोड जाणार आहे, हे स्पष्ट आहे. निवडणुका झाल्यानंतरही ही 'खुशी' कायम राहील, असा विश्वास सध्याच्या वातावरणातून व्यक्त होत आहे.थोडक्यात, तळोदा नगर परिषदेत उमेदवार आणि मतदार दोघेही सध्या 'खुश' असून, राजकीय 'दिवाळी'चा उत्साह शिगेला पोहोचला आहे.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077